नि.फौ.ख.क्र.५७०/२०२२
शासन–वि– कविता मनवर +१
नि.क्र. २१

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – निलेश खुशालराव तिजारे,
वय अंदाजे ३७ वर्ष, कामधंदा– व्यापार,
राहणार– वरुड, तह. व जि. वर्धा.

..........................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ची सरतपासणी– सरकारी वकील श्री.एस.एम.दुंगे यांच्या मार्फत.**

१. मी फिर्यादीला ओळखतो. तो माझा मित्र आहे. घटना दिनांक ०८.०५.२०२२ रोजी घडली. मला सायंकाळी ६.३० वाजताचे दरम्याने फिर्यादीचा फोन आला की, त्यांना जखम होवून रक्त लागले आहे व फोनवरुन भांडणाचा आवाज ऐकायला येत होता. त्यांनी मला त्यांना दवाखान्यात नेण्याकरीता फोन केला होता. मी माझे कारने त्यांच्या घरी पोहोचलो. मी पोहोचल्यावर पाहिले की पोर्चच्या जिन्यातील पायरीवर फिर्यादी डोक धरुन बसले होते. डोक्याच्या डाव्या बाजूने डोळयाच्या वर रक्त वाहत होते. मी त्यांना घटनेबाबत विचारपूस केली. तेव्हा त्यांनी सांगितले की आरोपी कविता हिला फिर्यादीने रस्त्यावर माती का टाकली याबाबत विचारले असता, तिने शिवीगाळ केली व फिर्यादीला गोटा फेकून मारला. मी फिर्यादीला पोलीस स्टेशनला घेवून गेलो. पोलिसांनी फिर्यादीला सरकारी दवाखान्यात नेले. तेथे त्यांच्या डोक्याला टाके लागले.

२. दुस–या दिवशी सकाळी १०.०० ते १०.३० वाजताचे दरम्यान पोलीस फिर्यादीच्या घरी आले होते. पोलिसांनी जागेची पाहणी केली असता, त्यांना फिर्यादीला मार लागलेला गोटा सापडला. त्याबाबत घटनास्थळ व जप्ती पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. पंचनामा जो मला दाखविण्यात आला, तो तोच आहे. त्यावर माझी आणि दुसरा पंच शुभम याची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते. मी तो दगड ओळखू शकतो. दगड जो मला दाखविण्यात आला, तो तोच असून, आर्टीकल **'अ'** वर आहे. तो माझे समक्ष सीलबंद करण्यात आला होता. त्या दगडावरील

लेबलवर माझी सही आहे. आज आरोपी न्यायालयासमक्ष हजर आहे.

**<u>उलट तपास आरोपींतर्फे – श्री.डी.पी.बोरकर विधीज्ञ यांचे मार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी जमिनीवर पडल्याने त्यांना मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की माझे समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दगड आर्टीकल 'अ' पहिल्यांदा बघत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

आरोपींतर्फे उलट तपास पुर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीक्रुती
GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Date: 2025.12.10 15:25:24 +0530
(जी.व्ही.जांगडे–देशपांडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
वर्धा, दिनांक १०–१२–२०२५

माझे समक्ष
GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Date: 2025.12.10 15:25:30 +0530
(जी.व्ही.जांगडे–देशपांडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
वर्धा, दिनांक १०–१२–२०२५